जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८२९ दिनांक - २३/११/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा पुणे शहर

**शिवाजीनगर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **तुषार कैलास काकडे,वय-१९ वर्षे,रा.फ्लॅट-नंबर ११०९/सी,एस.आर.ए.बिल्डींग,शिंदे वस्ती,हडपसर,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोयता, चाकु या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न, बेकायदा हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द खुनाचा प्रयत्न सारखे ०२ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षा करीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शिवाजीनगर पोलीस स्टेशन,पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी. गुन्हे शाखा पुणे शहर यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा. पोलीस आयुक्त यांनी चालु वर्षामध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ६२ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.